४०४
~~३३६~~ ८-१

आपक क्र. / जावक क्र.: २१/४/१८

**महाराष्ट्र शासन**

उपमुख्य अभियंता बी. डी. डी. इमारत
पुनर्विकास कार्यान्वयन कक्ष
मुंबई मंडळ

क्र.विविचा-२०१६/प्र.क्र.२६१/गृनिप
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १२ एप्रिल, २०१८.

म. गृ. नि. व क्षे. प्राधिकरण
आवक क्र. 1240
13 APR 2018
अधिकाऱ्याची सही

प्रति,

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
तथा सदस्य सचिव,
शक्ती प्रदत्त समिती - बीडीडी चाळी पुनर्विकास,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

मुं. गृ. नि. व क्षे. वि. मंडळ
आवक नं. प्रा. 1750
दिनांक 21/4/18

विषय :- मुंबई विकास विभाग (बीडीडी) चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.२८.०३.२०१८ रोजी झालेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या दहाव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. मुंमं/उमुअ/प्रनिस/न.क्र.बीडीडी-०७/१९३/१८, दि.२.०४.२०१८.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या आपल्या संदर्भाधिन पत्रान्वये मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकासासाठी गठित शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२८.०३.२०१८ रोजी झालेल्या दहाव्या बैठकीचे इतिवृत्त मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष, शक्ती प्रदत्त समिती, बी.डी.डी. चाळी पुनर्विकास यांचेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. सदर इतिवृत्तास मान्यता देण्यात आली आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

आपला,

(म. रा. पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**विषय - म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग [ बीडीडी ] चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.२८/०३/२०१८ रोजी झालेल्या ''शक्ती प्रदत्त समिती'' च्या दहाव्या बैठकीचे इतिवृत्त.**

बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाच्या संदर्भात गठित करण्यात आलेल्या शक्ति प्रदत्त समितीची दहावी बैठक दि.२८/०३/२०१८ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे बैठक कक्षात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.संजय कुमार | - मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग |
| २. | श्री. आशिष कुमार सिंग | - मा. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ३. | श्री. एन. जे. जमादार | - मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग |
| ४. | श्री. आर.ए. राजीव | - प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग |
| ५. | श्री. मिलींद म्हैसकर | - उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्रा. तथा सदस्य सचिव शक्तिप्रदत्त समिती |
| ६. | श्री.आर. डी. सावंत | - सह सचिव, विधि व न्याय विभाग |
| ७. | श्री.सुभाष लाखे | - मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ |
| ८. | श्री. परदेशी जे. व्ही. | - उदयान अधिक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका |
| ९. | श्री. अमोल वसईकर | - सहाय्यक, उदयान अधिक्षक, ग/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका |

सदर बैठकीत चर्चा करावयाच्या मुद्दयांची कार्यसूची व विषयनिहाय टिप्पणी सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली होती. कार्यसूचीत नमूद केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | शक्तिप्रदत्त समितीचा निर्णय |
|---|---|---|
| १ | शक्तिप्रदत्त समितीच्या नवव्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करणे. | मा. अध्यक्षांच्या अनुमतीने दि.०८/०१/२०१८ रोजी झालेल्या नवव्या शक्तिप्रदत्त समितीचे इतिवृत्त स्थायी करण्यात आले. |
| २ | बीडीडी चाळींतील १२/१२/१९९४ ते २८/०६/२०१७ या कालावधीत झालेल्या अनधिकृत हस्तांतरण प्रकरणामध्ये संबंधित गाळयांतील सध्याच्या भाडेकरुंकडून वसूल करावयाच्या दंडात्मक शुल्काबाबत. | या प्रकरणातील संबंधित गाळयातील भाडेकरुंकडून निवासी गाळयांच्या नियमितीकरणासाठी रु.२२,५००/- प्रति गाळा व अनिवासी गाळयांच्या नियमितीकरणासाठी रु.४५,०००/- प्रति गाळा असे दंडात्मक शुल्क आकारण्यात यावे.<br>संबंधित गाळेधारकांनी यापूर्वी हस्तांतरण शुल्कापोटी रु. १०,०००/- प्रति निवासी गाळा व रु. २०,०००/- प्रति अनिवासी गाळा संचालक बीडीडी कार्यालयाकडे अदा केले असतील तर सदरील रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम म्हणजेच रु.१२,५००/- प्रति निवासी गाळा व रु.२५,०००/- प्रति अनिवासी गाळा दंडात्मक शुल्क म्हणून आकारण्यात यावी. |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय</th><th>शक्तिप्रदत्त समितीचा निर्णय</th></tr>
<tr><td>३</td><td>नायगांव व ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील बांधकाम सुरु होण्यास असलेल्या अडचणींबाबत समितीस अवगत करणे.</td><td>नायगांव, ना.म. जोशी मार्ग व वरळी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत अवगत करण्यात येवून प्रकल्पातील प्रकल्प बांधकाम सुरु करण्यात येत असलेल्या अडचणी शक्तिप्रदत्त समितीच्या निदर्शनास आणून दिल्या. त्या अनुषंगाने या प्रकरणी पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.<br>अ) ना.म. जोशी मार्ग व नायगांव येथील पुनर्विकास प्रकल्पातील पहिल्या टप्प्याचे प्रकल्प बांधकाम त्वरीत सुरु करण्याचे दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>निर्णय</th><th>संबंधित विभाग / अधिकारी</th></tr>
<tr><td>अ</td><td>१) म्हाडाने देऊ केलेले १७२ संक्रमण गाळे ताब्यात घेऊन नायगांव बीडीडी चाळ येथील चाळ / इमारत क्र. १७बी व १८ बी मधील १६० पोलिस सेवानिवासस्थाने व ना.म. जोशी मार्ग येथील चाळ / इमारत क्र.५ व १२ मधील १२ पोलिस सेवानिवासस्थाने १५ दिवसात रिक्त करुन म्हाडास पुनर्विकासासाठी हस्तांतरीत करावेत.</td><td>गृह विभाग, महाराष्ट्र शासन.<br><br>आयुक्त, मुंबई पोलिस.<br><br>सहपोलिस आयुक्त (प्रशासन) मुंबई पोलिस</td></tr>
<tr><td></td><td>२) म्हाडाने देऊ केलेले १२ संक्रमण गाळे ताब्यात घेऊन ना.म. जोशी मार्ग येथील ललितकला भवन, आरोग्यधाम, (व्यायाम शाळा) व नेताजी पालकर, व्यायाम शाळा १५ दिवसात रिक्त करुन म्हाडास पुनर्विकासासाठी हस्तांतरीत करावेत.</td><td>प्रधान सचिव, कामगार विभाग<br><br>आयुक्त, कामगार कल्याण विभाग</td></tr>
<tr><td></td><td>३) ना.म. जोशी मार्ग बीडीडी चाळ येथील चाळ क्र.१२ मधील खोली क्र.१,२,३, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभागातील कामगारां साठीचे विश्रांती गृह व स्टोअर रुम या इमारती १५ दिवसात रिक्त करुन म्हाडास पुनर्विकासासाठी हस्तांतरीत करण्यात याव्यात.</td><td>प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग.<br><br>संचालक बीडीडी / सार्वजनिक बांधकाम विभाग.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| अ. क्र. | विषय | शक्तिप्रदत्त समितीचा निर्णय | | |
|---|---|---|---|---|
| | | | ४) नायगांव बीडीडी चाळ येथील चाळ क्र. बी-२० मधील तळमजल्यावरील २० गाळे व पहिल्या मजल्यावरील २० गाळे असे एकूण मुंबई महानगरपालिकेच्या शाळेकरीता वापरात असलेले ४० गाळे त्वरित रिक्त करुन म्हाडास पुनर्विकासासाठी हस्तांतरीत करण्यात यावेत. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका<br><br>शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका |
| | | ब | लाभार्थ्यांची पात्रता निश्चिती कार्यवाहीवेळी बीडीडी चाळींतील भाडेकरुंचे बायोमेट्रीक सर्व्हेक्षणाऐवजी शासकीय विभागाने जारी केलेल्या पुराव्यांच्या आधारे जसे की, आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पॅन कार्ड इत्यादीच्या आधारे पात्रता निश्चित करण्यात यावी.<br>चाळींतील खोल्यांव्यतिरिक्त इतर बांधकामातील (जसे की, झोपडया, स्टॉल इ.) लाभार्थ्यांची पात्रता निश्चिती कार्यवाहीवेळी बायोमॅट्रीक सर्व्हेक्षण पद्धतीचा अवलंब करावा.<br>नायगांव, ना.म. जोशी मार्ग व वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील लाभार्थ्यांची पात्रता निश्चिती कार्यवाही प्राधान्याने विहीत वेळेत पूर्ण करावी. | सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) धारावी व कुलाबा विभाग |
| | | क | बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील वृक्षांचे / झाडांचे पुनर्रोपण व तोडणीबाबत तसेच धार्मिक स्थळांबाबत म्हाडाने / संचालक, बीडीडी यांनी सादर केलेला प्रस्ताव त्वरित मंजूर करावा. | आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका<br><br>वृक्ष प्राधिकरण / बृहन्मुंबई महानगरपालिका<br><br>बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरीय समिती |

| अ. क्र. | विषय | शक्तिप्रदत्त समितीचा निर्णय | | |
|---|---|---|---|---|
| | | ड | बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील असहकार्य करणा-या भाडेकरु / रहिवाशांविरुदध म्हाडा अधिनियमांतर्गत कलम ९५(अ) लागू करण्याबाबत म्हाडाने गृहनिर्माण विभागामार्फत सादर केलेला प्रस्ताव त्वरित मंजूर करावा व अधिसूचना जारी करावी. | प्रधान सचिव, नगरविकास विभाग-१ |
| | | इ | बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्विकास गाळयांसाठी टेलिस्कोपिक टेक्सेशन पद्धती लागू करण्याबाबत म्हाडाने गृहनिर्माण विभागामार्फत सादर केलेला प्रस्ताव त्वरित मंजूर करावा. | प्रधान सचिव, नगरविकास विभाग-१ |

या चर्चेनंतर उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या अनुमतीने बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

( मिलींद म्हैसकर )
उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / म्हाडा
तथा सदस्य सचिव / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास

( संजय कुमार )
मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग
तथा सदस्य / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास

( सुमित मल्लिक )
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
तथा अध्यक्ष / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास